# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक - (विवरण पत्रात नमूद केल्या प्रमाणे)/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| संतोष हनुमंत मोरे | (विवरण पत्रात नमूद केल्या प्रमाणे ) |

**(निर्णय दि. १२.९.२०२५ )**

**विवेचन**

तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास एकूण १६ तक्रार अर्ज सादर केले आहेत. या तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी माहिती अर्जास योग्य उत्तर दिले नाही, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत आदेश पारीत केले नाही, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, माहिती मिळाली नाही, माहिती समाधानकारक नाही इ. कारणे नमूद करून आयोगाकडे वेगवेगळ्या प्राधिकरणाविरुद्ध कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज सादर केले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालील प्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत प्राप्त झाला नसेल, किंवा यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (६) अन्वये पोटकलम (१) किवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करून, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९ (३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णयाविरुद्धचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनाकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२-१२-२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये "The nature of the power under Section 18 is supervisory in character where as the procedure under Section 19 is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the statute, namely, by following the procedure under Section 19. This Court is, therefore, of the opinion that Section read with Section 19 provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९ (१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये द्वितीय दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास द्वितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता या सर्व तक्रार प्रकरणी तक्रारदार यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या संपूर्ण अपील प्रक्रियेचा अवलंब न करता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात न घेता आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रारी दाखल केल्या आहेत. अशा पद्धतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाशी विसंगत ठरते.

बरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेश लक्षात घेता तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह तक्रारदार यांचे १६ तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.- (विवरण पत्रात नमूद केल्या प्रमाणे) /सातारा 9194 दिनांक 12/9/2025

| तक्रारदाराचे नाव | | | | संतोष हनुमंत मोरे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र | तक्रार क्र | वर्ष | संबंधित जिल्हा | तक्रार दाखल दिनांक | जन माहिती अधिकारी पदनाम | जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय |
| 1 | 1241 | 2023 | सातारा | 26.12.2023 | सहा. प्रशासन अधिकारी | (साप्रवि)जिल्हा परिषद, सातारा |
| 2 | 1784 | 2024 | सातारा | 16.12.2024 | सहा. प्रशासन अधिकारी | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा |
| 3 | 1595 | 2024 | सातारा | 12.11.2024 | ग्रामविकास अधिकारी | ग्रा.पं. कार्यालय, सांगवी ता. बारामती जि.पुणे |
| 4 | 236 | 2024 | सातारा | 12.11.2024 | सहा. प्रशासन अधिकारी | पंचायत समिती कार्यालय फलटण जिल्हा सातारा |
| 5 | 523 | 2024 | सातारा | 05.11.2024 | सहा. प्रशासन अधिकारी | (सा.प्र.वि) जिल्हा परिषद सातारा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1247 | 2024 | सातारा | 04.10.2022 | नायब तहसीलदार | उपविभागीय अधिकारी कार्यालय फलटण |
| 7 | 1222 | 2023 | सातारा | 18.12.2023 | मंडल अधिकारी | आदर्की बु ता. फलटण |
| 8 | 1106 | 2023 | सातारा | 09.10.2023 | मुख्य निरिक्षक | बियाणे (गुनि ७/८) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| 9 | 852 | 2023 | सातारा | 25.09.2023 | नायब तहसिलदार | उपविभागीय अधिकारी फलटण |
| 10 | 820 | 2023 | सातारा | 18.09.2023 | इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय | महाराष्ट्र राज्य, पुणे |
| 11 | 819 | 2023 | सातारा | 18.09.2023 | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | ग्रामपंचायत विभाग, सातारा जिल्हा परिषद सातारा |
| 12 | 818 | 2023 | सातारा | 18.09.2023 | ग्रामविकास अधिकारी | ग्रामपंचायत उंब्रज, ता. कराड जि.सातारा. |
| 13 | 26 | 2024 | सातारा | 08.01.2024 | नायब तहसिलदार | तहसील कार्यालय फलटण, जिल्हा सातारा |
| 14 | 2 | 2024 | सातारा | 01.01.2024 | सहा प्रशासन अधिकारी | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सातारा |
| 15 | 309 | 2022 | सातारा | 08.08.2022 | तहसिलदार | तहसील कार्यालय फलटण |
| 16 | 502 | 2022 | सातारा | 20.10.2022 | अधीक्षक | सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय, सातारा |

**********************

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ